**ठळक बातम्या**

- राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी भाजपाकडून ज्येष्ठ नेते विनोद तावडे यांना संधी

- कर्जवसुलीत रिझर्व बँकेच्या नियमांचं उल्लंघन करणाऱ्या संस्था किंवा सावकारांवर कारवाई करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन

- राज्य परिवहन महामंडळाची शिवनेरी बस सेवा आता आणखी आठ मार्गांवर धावणार

- पश्चिम आशियातल्या संघर्षग्रस्त भागातल्या भारतीय नागरिकांच्या मदतीसाठी परराष्ट्र मंत्रालयाचा नियंत्रण कक्ष स्थापन

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेचा उपान्त्य सामना आज कोलकात्यात दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंडमधे रंगणार

**<><><><><>**

राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी महाराष्ट्रातल्या जागांकरता भारतीय जनता पार्टीने ४ उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, ज्येष्ठ नेते विनोद तावडे, यांच्या खेरीज नागपूरच्या माजी महापौर माया इवनाते आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपात आलेले रामराव वडकुते या दोन नवीन चेहऱ्यांचा त्यात समावेश आहे.

विरोधी पक्षांच्या महाविकास आघाडीने अद्याप उमेदवार जाहीर केलेले नाहीत, आज ही नावं जाहीर होतील असं काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी मुंबईत वार्ताहरांना सांगितलं.

**<><><><><>**

बँका किंवा बिगरबँक वित्तीय संस्थांना कर्जपुरवठा प्रक्रीयेत रिझर्व बँकेने घालून दिलेल्या नियमांचं पालन करणं आवश्यक आहे, रिझर्व बँकेने घालून दिलेल्यापेक्षा जास्त व्याजदर लावणाऱ्या किंवा इतर नियमांचं उल्लंघन करणाऱ्या संस्था किंवा सावकारांचे परवाने रद्द केले जातील असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं....

**होल्ड- बाईट- मुख्यमंत्री**

कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्यांना किडनी विकायला लागल्याचा तसंच शेतकऱ्यांकडून कर्जवसुली करताना अत्याचार होत असल्याचा मुद्दा काँग्रेसचे भाई जगताप आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शशिकांत शिंदे यांनी उपस्थित केला होता.

**<><><><><>**

नागपूरमधल्या एसबीएम कंपनीत स्फोट होऊन वीस कामगारांचा मृत्यू झाल्याचा मुद्दा आज विधानसभेत काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्तावाद्वारे उपस्थित केला. नागपूर जिल्ह्यात स्फोटकांचे अकरा  कारखाने आहेत, गेल्या तीन वर्षांत ४३ कामगारांचा मृत्यू झाला आहे. ही अतिशय गंभीर बाब असून यावर अद्याप कुणावरही कारवाई झाली नाही असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. अशा प्रकारच्या घटना थांबविण्यासाठी कोणतीही पावलं उचलली गेली नाहीत अशी टीका करत वडेट्टीवार यांनी या कंपनीचं ऑडिट करण्याची मागणी केली.

वडेट्टीवार यांनी उपस्थित केलेला मुद्दा अतिशय गंभीर असून शुक्रवारच्या आत सभागृहात यावर चर्चा केली जाईल असं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितलं.

महामार्गांप्रमाणेच राज्यातल्या सर्व पाणंद रस्त्यांना संकेतांक दिला जाणार असून आतापर्यंत ९७ हजार ५६४ रस्त्यांना असा क्रमांक दिल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. पाणंद रस्त्यांच्या सीमा आखून त्याची नोंद सातबाऱ्यावर घ्यायचा निर्णय सरकारने घेतला आहे. याची जबाबदारी ग्राम महसूल अधिकाऱ्याकडे सोपवली असल्याचं बावनकुळे यांनी सांगितलं. अतिक्रमण काढून ग्रामीण रस्ते, गाडी रस्ते यांचं सीमांकन करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे असंही ते म्हणाले. मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्त्याची माहिती देणारं संकेतस्थळ ३१ मार्चच्या आधी तयार केलं जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं. रणधीर सावरकर, श्वेता महाले यांनी याबाबतचा प्रश्न विचारला होता.

**<><><><><>**

बांबू लागवड आणि वापराला प्रोत्साहन देण्यासाठी अटल बांबू समृद्धी योजना सरकार राबवत असून बांबू लागवडीसाठी एका हेक्टरसाठी सात लाख रुपये अनुदान दिलं जातं अशी माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत दिली. चेतन तुपे, शेखर निकम, नाना पटोले,

किशोर जोरगेवार यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला ते उत्तर देत होते. बांबू लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार विविध योजना राबवतं. यानुसार बांबू मंडळाच्या माध्यमातून खेळणी तयार करण्याची योजना राबवली जाते, एक हेक्टर लागवडीसाठी पाचशे रोपं दिली जातात, दोन हेक्टरपर्यंत लागवडीसाठी टिश्यू कल्चरची रोपं दिली जातात, असं नाईक यांनी सांगितलं. बांबुपासून विविध वस्तू तयार करणं हा बुरूड समाजाचा पारंपरिक व्यवसाय आहे. त्यांच्या व्यवसायाला फटका बसला आहे. त्यामुळे त्यांना प्रशिक्षण दिलं जाईल, तसंच त्यांना बांबू उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल असं आश्वासन नाईक यांनी दिलं.

**<><><><><>**

मुंबई- पुणे महामार्गावर धावणाऱ्या आरामदायी सुरक्षित शिवनेरी सेवेचा आता राज्यभर विस्तार करण्याच्या राज्यसरकारचा निर्णय असल्याची माहिती आज परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. त्यासाठी नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त २०० व्होल्व्हो बसेस खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया सुरू आहे. या बस एस्टीच्या ताफ्यात दाखल झाल्या की नाशिक–पुणे, नाशिक–छत्रपती संभाजीनगर, नाशिक–जळगाव–धुळे, पुणे–कोल्हापूर, पुणे–सांगली, पुणे–सोलापूर, नागपूर–चंद्रपूर, नागपूर–अमरावती–अकोला अशा प्रमुख मार्गांवर शिवनेरीची सेवा सुरु होईल अशी माहिती सरनाईक यांनी एका पत्रकाद्वारे दिली आहे.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या वाढत्या तणावामुळे तिथे राहणाऱ्या भारतीय नागरिकांच्या मदतीसाठी परराष्ट्र मंत्रालयाने नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. १८०० ११८ ७९७ आणि ९१११ २३०१ २११३ या क्रमांकांवरून सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधता येईल. पश्चिम आशियात जवळपास १ कोटी भारतीय नागरिक राहतात आणि त्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य असल्याचं मंत्रालयाने म्हटलं आहे. अमेरिका-इराण संघर्षादरम्यान इराणमधल्या भारतीय दूतावासाने तेहरानमधून शेकडो भारतीय विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणी हलवलं आहे.

दरम्यान, आखातातला संघर्ष थांबवण्यासाठी वाटाघाटीचा मार्ग स्वीकारावा असं आवाहन भारतानं पुन्हा केलं आहे. पश्चिम आशियातल्या अस्थिरतेचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम होऊ शकतो, भारताचे लोक जगभरात कामासाठी विखुरले आहेत, त्यामुळे भारताचा

जहाजांवरच्या हल्ल्यांनाही विरोध असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जयस्वाल यांनी सांगितलं.

<><><><>

पश्चिम आशियातल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे आखाती देशांतली हवाई सेवा विस्कळीत झाली आहे. अनेक उड्डाणं रद्द करण्यात आली आहेत. परिणामी हजारो लोकांचं मायदेशी परतणं अनिश्चित झालं आहे. अमरावतीमधले १२ जण दुबईत तर २ जण अबुधाबी इथे अडकले आहेत. अनेक भारतीय नागरिक आणि पर्यटक यांनी देशाच्या दूतावास आणि आपत्कालीन कक्षाशी संपर्क साधून इराण आणि विशेषतः दुबईमधून बाहेर पडण्यासाठी मदत मागितली आहे.

<><><><>

पश्चिम आशियातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आज भारतीय शेअर बाजारांमध्ये घसरण झाली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स सुमारे ८०० अंकांनी घसरून ७९ हजार ४००च्या आसपास व्यवहार करतो आहे. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी सुमारे ३०० अंकांनी घसरून २४ हजार ६००च्या आसपास व्यवहार करतो आहे.

<><><><>

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतला पहिला उपान्त्य सामना आज कोलकात्यात ईडन गार्डन्स मैदानावर दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंडदरम्यान रंगणार आहे. सामना संध्याकाळी सात वाजता सुरु होईल. यंदाच्या स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेचा संघ आतापर्यंत एकही सामना हरलेला नाही. सरस धावगतीच्या जोरावर पाकिस्तानला मागे टाकत न्यूझीलंडने उपान्त्य फेरी गाठली आहे.

उपान्त्य फेरीत भारताची गाठ उद्या इंग्लंडशी पडेल. हा सामना मुंबईत वानखेडे मैदानावर होईल.

<><><><>

राज्यातल्या हवामानात सातत्यानं बदल होत असून आता उष्णतेचा प्रभाव अधिक जाणवू लागला आहे. हवामान विभागानं राज्यातल्या काही भागांसाठी उष्ण आणि दमट हवामानाचा येलो अलर्ट जारी केला आहे. नागरिकांनी दुपारच्या वेळेत बाहेर पडताना विशेष काळजी घ्यावी, असं आवाहन करण्यात आलं आहे. विदर्भात अकोला इथे देशातल्या

उच्चांकी साडे ३८ सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. येत्या काही दिवसांत तापमान ४० अंशांच्या दिशेनं जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे दुपारी बारा ते चार या वेळेत शक्यतो घराबाहेर पडणं टाळावं, असा सल्ला प्रशासनाने दिला आहे.मुंबईसह संपूर्ण कोकण पट्ट्यात उष्ण आणि दमट हवामानाचा प्रभाव वाढला आहे. पालघर, ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांत आर्द्रतेमुळे अस्वस्थता अधिक जाणवण्याची शक्यता आहे. तर राज्यातलं नीचांकी तापमान धुळ्यात १२ पूर्णांक ८ अंश सेल्सिअस होतं.

**<><><><><>**

राज्यात पालघर जिल्ह्यात मुंबई-अहमदाबाद महामार्गावर एका टेम्पोला आग लागून दोन जण मृत्युमुखी पडले. काल रात्री साडेदहाच्या सुमाराला हा टेम्पो महामार्गावरून जात असताना त्याला अचानक आग लागली आणि वेगामुळे आगीच्या ज्वाळांनी पूर्ण टेम्पोला वेढलं. टेम्पो चालकाचा जागीच होरपळून मृत्यू झाला. आगीतून सुटका करून घेण्यात यशस्वी झालेल्या मदतनीसाचा नंतर उपचारांदरम्यान मृत्यू झाला. पोलिसांनी अपघाती मृत्युची नोंद केली असून आगीच्या कारणांचा शोध सुरु आहे असं पोलिसांनी सांगितलं.

**//<><><><><>//**